जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

(महसूल शाखा)

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, फाजलपुरा, छत्रपती संभाजीनगर

दुरध्वनी:0240-2334501 ई मेल-: abdcolloffice@gmail.com

जा.क्र.2024/मशाका/जमीन-2/शा.ज./कावि 38. दिनांक 19 /01/2024.

प्रति,

अँड. गणेश श्रीरंग सातारकर (नाळे)
शिवनेरी गट नंबर 153, सातारा रोड, मु. पो. फरांदवाडी,
ता. फलटण, जिल्हा सातारा – 415523.

1231
2311

विषय :- मराठवाडा विभागात मध्ये श्रीमंत छत्रपती महाराणी सईबाई महाराज यांचे शासकीय स्मारकासाठी जागा / परवानगी मिळण्याबाबत.

संदर्भ- 1. मा. उपायुक्त, (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.2023/ मशाका/ जमीन-1/ कावि-1907 दिनांक 01.01.2024 प्राप्त दिनांक 12.01.2024.
2. नायब तहसिलदार (गृह) जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.2024/ गृहशाखा /दंडविभाग/संकलन-5/कावि-22 दिनांक 04.01.2024 प्राप्त दिनांक 12.01.2024.
3. आपले निवेदन अर्ज दिनांक 19.12.2023.

उपरोक्त विषयी संदर्भीय क्रमांक 01 मधील मा. उपायुक्त (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.2023/ मशाका/ जमीन-1/ कावि-1907 दिनांक 01.01.2024 प्राप्त दिनांक 12.01.2024 व संदर्भ क्रमांक 02 मधील नायब तहसिलदार (गृह) जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र जा.क्र.2024/गृहशाखा /दंडविभाग/संकलन-5/कावि-22 दिनांक 04.01.2024 प्राप्त दिनांक 12.01.2024 सोबत संदर्भ क्रमांक 03 मधील आपले निवेदन अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

सदर निवेदन अर्जामध्ये नमुद केल्यानुसार, मराठवाडा विभागामध्ये श्रीमंत छत्रपती महाराणी सईबाई महाराज यांचे शासकीय स्मारकासाठी जागा / परवानगी मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

आपल्या विनंती अर्ज/ निवेदनाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, **मा. सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील क्र. 1132/2011 एस. एल. पी. सी. 31.09.2011 जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाब व इतर, तसेच मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी क्रिमीनल ॲप्लीकेशन एपीएल नं. 615/2015 मध्ये दिलेल्या न्याय निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने महसूल व वन विभाग शासन निर्णय क्र. 03/2011/प्र.क्र.53/ज-1, दिनांक 12 जुलै, 2011 मधील तरतुदीनुसार सार्वजनिक वापरातील जमिनी/गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर शासनाने निर्बंध घातले असून गायरान/गुरचरन अथवा सार्वजनिक वापरातील जमीन कोणत्याही व्यक्ती, खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी, मंजूर करण्यात येऊ नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे सदर्भीय अर्जानुसार जमीन मागणीबाबतचा आपला अर्ज उक्त शासन निर्णयातील तरतुदीनुसार मान्य करता येणार नाही.**

करीता आपला संदर्भीय अर्ज निकाली काढुन दफ्तरी दाखल करण्यात येत आहे.

D.I.G.S.

(पल्लवी लिगदे)
तहसिलदार महसूल,
जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रतिलिपी-

1. मा. उपायुक्त, (महसूल) विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. नायब तहसिलदार (गृह) जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव.

(पल्लवी लिगदे)
तहसिलदार महसूल,
जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

E:\Aseem2017\शासकीय जमीन प्रमाणपत्र 2021

Scanned with OKEN Scanner